दिल्ली विमानतळावर ड्रुक एअरच्या विमानाने आम्ही पारो (भूतान) ला जाणाऱ्या विमानासाठी चेक-इन करत होतो. तेव्हा चेक-इन करणाऱ्या व्यक्तीने आम्हास विचारले की डाव्या का उजव्या बाजूचे सीटस् हवेत? मी सांगितले कोणतेही द्या. त्याने उजवीकडचे सीटस् दिलेत कारण आमच्या ग्रुपमधील बऱ्याच जणांना उजव्या बाजूचे सीटस् मिळाल्याने व मागेपुढे असल्याने मी त्यातच आनंद मानला कारण अडीच तासाच्या प्रवासात गप्पा मारता येतील.

साधारण पाऊण तासाने वैमानिकाने माहिती देताना सांगितले की विमानाच्या डाव्या बाजूला हिमालय पर्वतातील उत्तुंग हिमशिखरे दिसत आहेत तेव्हा मला वरील प्रश्नाचा उलगडा झाला. पण ढगाळ हवामान असल्याने हिमशिखरे फारच कमी वेळ दिसली. बऱ्याच जणांनी जमेल तसे फोटो काढून घेतले.

पारो विमानतळावर उतरल्यावर आम्ही आधी विमानतळाच्याच प्रेमात पडलो. संपूर्ण विमानतळ सर्व बाजूंनी उंचच उंच डोंगरांनी वेढलेला आहे. **Charity begins at home** या उक्तिप्रमाणे संपूर्ण विमानतळावर अत्यंत स्वच्छता होती. हा विमानतळ समुद्रसपाटीपासून ७३०० फुटावर असून अत्यंत धोकादायक म्हणून जगात गणला जातो. विमानतळाला लागूनच रस्ता व पारो नदी आहे. उंच पर्वत शिखरे, दाट झाडी इ. मुळे विमानतळाच्या प्रेमात न पडलो तरच नवल. धोकादायक विमानतळामुळे येथील वैमानिक पण जगातील १० उत्कृष्ट वैमानिकांमध्ये गणले जातात. दुपारची २.३० ची वेळ होती व थंड वाऱ्यांनी आमचे स्वागत केले. विमानतळाच्या इमारतीच्या सर्व भिंती अत्यंत उत्कृष्टपणे भूतानमधील पारंपरिक चित्रे, नक्षीकाम इ. ने रंगविलेल्या होत्या. विमानतळावर आतून सुध्दा खांब, भिंती उत्कृष्टपणे रंगविलेल्या आहेत. आम्ही एखाद्या घरातच प्रवेश करत आहोत असे वाटत होते. भूतानी लोकांचा आपलेपणा, प्रेमळपणा आम्हास इमिग्रेशन करण्यापासूनच अनुभवायला मिळाला.

ग्रुपमध्ये आम्ही १४ जण होतो. आमच्यासाठी एक मिनी बस केली होती. बाहेर आल्यावर तेथील गाईडने आमचे पांढरे शुभ्र उपरणे प्रत्येकाच्या गळ्यात घालून आनंदाने स्वागत केले व थोडेसे ओणवे होऊन अत्यंत अदबीने नमस्कार केला.

भूतान म्हणजे उंच भूमीचा देश. उंचच उंच पर्वतरांगा, खोल दऱ्या व घनदाट हिरव्या जंगलामध्ये वसलेला हा लहानसा देश, नैसर्गिक सृष्टीसौंदर्याने अपार नटलेला आहे. ड्रॅगनचा देश म्हणूनही हा प्रसिध्द आहे. **Druk** म्हणजे ड्रॅगन. बऱ्याच नावाच्या सुरवातीस **Druk** शब्द लावण्याची पध्दत आहे. उदा. **Druk Air, Drukyul Hotel** इ. या देशाच्या नकाशावरच ड्रॅगनचे चित्र आहे. ९० टक्क्याच्या वर जनता बौध्द धर्मीय आहे. बुध्दाचा अहिंसाप्रिय व अत्यंत शांत स्वभाव याचा खरा अर्थ भूतान देशातील लोकांनाच जास्त कळला असावा असे आम्हास ६ दिवसांच्या वास्तव्यात प्रकर्षाने जाणवले. प्रत्येक गावामध्ये झोंग **(Dzong)** असते. ते त्यांचे धर्मपीठ. तेथील प्रमुख व्यक्ती म्हणजे 'मॉंक' **(Monk)** व त्यांच्या मदतीला/ जोडीला असतात ते लामा. येथे पारंपरिक राजेशाही पण आहे. लोकनियुक्त संसद असल्याने, राजाचीही चौकशी करण्याचा अधिकार संसदेस आहे.

पारोहून आम्ही थिंम्फू या राजधानीच्या गावी गेलो. संपूर्ण शहराला कवेत घेणारा १६९ फूट उंचीचा बुद्धाचा अत्यंत भव्य व डोळे दिपवणारा पुतळा आम्ही प्रथम पाहण्यास गेलो. याला 'बुद्ध डोरडेन्मा स्टॅच्यू' म्हणतात. पुतळा ब्राँझ मध्ये असून सोन्याचा मुलामा दिला आहे. संपूर्ण परिसर खूपच भव्य आहे. उंच टेकडीवर असल्याने थिम्फू शहरातून कोठूनही या पुतळ्याचे दर्शन होते. पुतळ्याखालील भव्य मंदिरात बुद्धाचे 'बारा इंच' उंचीचे एक लाख पुतळे व 'आठ इंच' उंचीचे पंचवीस हजार पुतळे बसवण्याचे काम प्रगती पथावर आहे.

हा भव्य पुतळा २०१५ मध्ये नुकताच उभारण्यात आला व पर्यटन प्रेमींचे ते मुख्य आकर्षण आहे.

तेथून **'Motithang Takin Preserve'** हे प्राणिसंग्रहालय पाहण्यास गेलो. **Takin** हा मेंढासदृश प्राणी भूतानचा राष्ट्रीय प्राणी असून त्याचे संवर्धन तेथील सरकार कसोशीने करत आहे.

दुसरे महत्वाचे ठिकाण म्हणजे १०,५०० फूट उंचावर असणारी 'डोचुला खिंड'. अतिशय नयनरम्य असे हे ठिकाण आहे. येथून पण हिमशिखरांचे दर्शन होते. पण अत्यंत दाट धुक्यामुळे ते आम्हास झाले नाही. असंख्य रंगीबेरंगी पक्षी व फुलपाखरांचे आजूबाजूच्या परिसरात दर्शन होते. सन २००३ मध्ये 'आसामी गुरील्ला' युद्धामध्ये मारल्या गेलेल्या भूतानी शूर सैनिकांचे स्मृतिस्थळ पण येथे लक्ष वेधून घेते. हे युद्ध भूतानच्या सैनिकांनी भारतातर्फे आसामच्या **'ULFA'** या भारताविरोधी संघटनेतर्फे लढले होते. १०८ लहान चोरटेन (मंदिरे/स्तूप) या सैनिकांच्या स्मरणार्थ अतिशय सुंदर रितीने रस्त्या शेजारील टेकडीवर बांधली आहेत. बाजूलाच एक छान हॉटेल होते. तेथे गरमगरम चहा/कॉफी घेतल्याने $2^0$C च्या थंडीत शरीरास थोडी उब मिळाली.

येथून आम्ही पुनाखा या गावी गेलो. पुनाखा हे भूतानचे सर्वात जुने व १९५५ पर्यंत राजधानीचे शहर होते. येथील किल्लासदृश मॉनेस्ट्री म्हणजे झोंग (Dzong) अतिशय भव्य व देखणी आहे. शेजारून सुंदर नदी वाहते व त्यामुळे सौंदर्यात आणखीनच भर पडते, या नदीत आम्ही ठरषींळपस चा थरारक आनंद घेतला. त्यानंतर आम्ही सांस्कृतिक दृष्ट्या महत्त्वाचे असे पारो या शहरी आलो. येथील National Museum व राजवाडा पाहण्यासारखा आहे. म्युझियममध्ये पंडित नेहरू पासून ते मनमोहनसिंग या भारताच्या भूतपूर्व पंतप्रधानांसमवेत भूतानच्या राजांचे भारत भूतान मैत्रीचे अनेक फोटो आहेत. म्युझियममध्ये भूतानबद्दलची बरीच माहिती तसेच अनेक ऐतिहासिक वस्तुंचा संग्रह आहे. पारोपासून जवळच चेलेला ही १२,४०० फूट उंचीवरील खिंड पण आम्ही पाहिली. ही भूतानमधील सर्वात उंच खिंड आहे. तेथून दोन तीन हिमशिखरांचे दर्शन झाले.

शेवटच्या दिवशी पारोजवळील सर्वात गर्दी खेचणारे ठिकाण म्हणजे 'टायगर्स नेस्ट' आम्ही पाहण्यास गेलो. याचे मूळ नाव 'पारो ट्रात्सांग'. हे ठिकाण पारोगावापासून २० कि.मी. अंतरावर आहे. बसमधून उतरल्यावर ३ कि.मी. चा चढ पायी अथवा घोड्यावर बसून चढता येतो. नंतर ३१/२ कि.मी. चा चढ पायीच चढावा लागतो. त्यातील एक टप्पा म्हणजे ४५० पायऱ्या दरीत उतरायच्या व नंतर २५० पायऱ्या परत चढायच्या, तेव्हा आपण ह्या मॉनेस्ट्रीला पोहोचतो. परत येताना प्रथम २५० पायऱ्या उतरणे व नंतर ४५० पायऱ्या चढणे व नंतर ६.१/२ कि.मी. पायीच येणे. येताना उतार खूपच तीव्र असल्याने घोडे वापरत नाहीत. कारण पडण्याची शक्यता खूपच असते. मुख्य मंदिराची समुद्र सपाटीपासून उंची १०२३२ फू ट आहे. उंचच उंच डोंगरावर कडे कपारीत हे वाघाचे घरटे बांधले आहे. बस थांब्यापासून साधारण १८०० ते १९०० फू ट उंचीवर हे ठिकाण आहे.

'टायगर्स नेस्ट' या मंदिराची आख्यायिका मोठी मजेशीर आहे. आठव्या शतकामध्ये बुद्ध 'गुरू पद्मसंभव', ज्यांना दुसरे बुद्ध म्हणून संबोधिले जाते, ते एका वाघिणीच्या पाठीवर बसून तिबेटहून आले. तिबेटमधील एका राणीने वाघीणीचे रूप घेतले होते. गुरु पद्मसंभवांनी 'गुरू डोरजी ड्रोलो' अशा भीती वाटणाऱ्या व्यक्तिचे रूप घेतले व गुहेतील दुष्ट शृतींचा निःपात करून गुहा पूर्णपणे शुद्ध केली. त्यामुळे बुद्धधर्माचे पावित्र्य राखले गेले. त्यांनी तेथे तीन वर्षे कठोर तपश्चर्या केली व नंतर एकूण आठ अविष्कारात ते प्रगट झाले. त्यामुळे बुद्ध धर्मात हे ठिकाण अत्यंत पवित्र मानतात. इ.स. १६९२ मध्ये २ मजली मंदिर बांधले गेले. सध्या येथे एकूण ९ मंदिरे आहेत. डोंगर कपारीतून एक छोटा पण छानसा धबधबा वाहतो. धबधब्याच्या पाण्यात उन्हामुळे इंद्रधनुष्य दिसत होते.

आम्ही एकूण ८ जण थेटपर्यंत चढून गेलो. पैकी ३ जण ४०-४५ वयाच्या आतले होते. आम्ही ५ जण ६० ते ७० वर्षे वयाचे होतो. त्यात मी ७० वर्षे वयाचा सर्वात वयस्कर होतो. सुरवातीचे ३ कि.मी. आम्ही घोड्यावर बसून गेलो. संपूर्ण प्रवासात एकूण ५॥ ते ६ तास लागले. या वयातही सुदैवाने काही त्रास झाला नाही. आम्ही सर्व सावकाश चढलो व उतरलो कारण सारखा दम लागत होता. दाट हिरवाई, सर्वत्र पसरलेल्या/लावलेल्या बुद्ध मंत्रातील रंगीत पताका, (ज्याला ५ elements म्हणजे आपण पृथ्वी, आप, तेज, वायू व आकाश अशी पंचमहाभुते म्हणतो), सकाळच्या अत्यंत थंड हवेतील ओलावा व या सर्व वातावरणामुळे एका वेगळ्याच उंचीवर घेऊन जाणारा अध्यात्मिक पवित्रपणा इ. मुळे आम्हास एक वेगळीच शक्ती मिळाली. आमच्या सोबत बरीच गर्दी होती. त्यात परदेशी लोकांचा (भारतीय सोडून) भरणा अधिक होता. आम्ही प्रत्येकाने सोबत दोन काठ्या घेतल्याने उतरताना त्यांचा खूपच आधार मिळत होता. सुदैवाने कोणालाच त्रास झाला नाही. त्यामुळे

'टायगर्स नेस्ट' ची यात्रा सफल झाल्याचा आनंद प्रत्येकाच्या चेहऱ्यावर होता.

भारताच्या तुलनेत फक्त ७ लाख लोकसंख्येचा भूतान हा सर्वच दृष्टीने अत्यंत लहान असा देश आहे. पण वरील प्रवास वर्णन सोडले तर हा लेख लिहिण्याचा मुख्य उद्देश म्हणजे ६ दिवसाच्या अत्यंत अल्प वास्तव्यात आम्हास अत्यंत महत्त्वाच्या व खूप चांगल्या गोष्टी शिकावयास व अनुभवास मिळाल्या.

भूतानमधील सर्वच रस्ते अत्यंत चांगले व स्वच्छ होते. गावातील रस्त्यावर कोठेच सिग्नल्स नव्हते. कोणीही वाहन चालक हॉर्नचा वापर करत नव्हते अथवा अपवादानेच हॉर्नचा वापर करत होते. रस्ता ओलांडतांना 'झेब्रा' क्रॉसिंगचाच वापर करायचा असा कठोर नियम आहे. अन्यथा दंड खूप आहे. दोन चाकी वाहने अपवादानेच दिसत होती. गावात कोठेच गर्दी, घोळका, गडबड इ. दृष्टीस पडत नसे, सगळीकडे स्वच्छतेस प्राधान्य होते. प्रत्येक पर्यटन स्थळाजवळ 'पेड रेस्ट रुम्स' होत्या. म्हणजे पैसे देऊनच टॉयलेटचा वापर करावा लागतो. टायगर्स नेस्टला जाताना पण ३ कि.मी. वरती एक कॅफेटेरिया होते. तेथेच वॉशरूम्स होत्या. त्यानंतर फक्त टायगर्स नेस्टच्या मंदिरातच. तेथे जाताना आमच्या गाईडने स्पष्ट सूचना दिल्या होत्या की, वॉशरूमचाच वापर करा व कचरा कोठेही टाकू नका कारण इतक्या वरून कचरा गोळा करून खाली आणणे पण त्रासदायक होते. भूतानमध्ये तंबाखू, धूम्रपान व प्लॅस्टिकला पूर्ण बंदी आहे. विशेष म्हणजे नियमांचे पालन आनंदाने केले जाते. सार्वजनिक स्वच्छता कसोशीने पाळली जाते.

वैद्यकीय सेवा नाममात्रच आहे पण पूर्णपणे मोफत आहे. संपूर्ण देशात एकच सर्जन आहे व जिल्हा प्राथमिक केंद्रे आहेत. तेथे डॉक्टर्स नाहीत. भारतातून प्रशिक्षण घेऊन आलेल्या परिचारिका औषधे देतात. पुरूष व स्त्रीचे प्रमाण १:५ असे आहे त्यामुळे हॉटेल्समध्ये व इतर बऱ्याच ठिकाणी म्हणजे बारमध्येसुद्धा कामास मुली अथवा स्त्रियाच जास्त आहेत. हॉटेलमध्ये प्रवाशांचे सामान मुलीच उचलतात. कामाच्या ठिकाणी पारंपरिक पोषाखच घालावा लागतो. पुरूषांच्या पोषाखास 'घो' व स्त्रियांच्या पोषाखास 'किरा' म्हणतात. मुख्य चलन Nultrum (नूल्ट्रम) आहे. पण भारतीय रूपयाइतकीच त्याची किंमत असल्याने आपल्या चलनाच्या नोटा तेथे चालतात. येथे जात पात अथवा 'कास्टिझम' अजिबात नाही. राजाला पण भूतानमधील मुलीशीच लग्न करावे लागते. येथील राजाने स्वतःचा बंगला, संसदेस दिला असून स्वतः एका लहान बंगल्यात राहतो. बहुतेक सर्व ठिकाणी म्हणजे हॉटेल दुकानात राजा-राणींचे फोटो लावलेले असतात व त्यांच्याबद्दल लोकांच्या मनात अपार श्रद्धा व आदर असतो. घरात बाळ जन्मल्यावर त्यास धर्मगुरूकडे नेले जाते. धर्मगुरूच्या आशीर्वादानेच त्याचे नामकरण केले जाते.

आमच्या मुक्कामाच्या एक दिवस आधी भूतानमधील मुलामुलींचा एक सांस्कृतिक कार्यक्रम ठेवला होता. पारंपरिक लोकनृत्य सादर करताना संतूर सारख्या वाद्यावर मुलींनी ३-४ गाणी म्हटली. सर्वच गाणी अत्यंत मधूर स्वरात त्यांनी सादर केली. ती सर्वांनाच मनापासून भावली.

भूतानमधील सर्वसामान्य जनता भारतीयांचा आदर करते. सहसा कोणाचाच तिरस्कार ते करत नाहीत. वागण्यात अत्यंत नम्र, चेहरे नेहेमी हसतमुख असतात. त्यात समाधान मानण्याची वृत्ती (गरीबी असून सुद्धा), नेहमी दुसऱ्याला मदत करण्यास तत्पर, इ. सर्व गुणामुळे भूतानी जनता नेहमीच आनंदी राहते म्हणून या देशाला 'आनंदी लोकांचा देश' असेही म्हणतात.

आपण विकसित देशांचे अनुकरण करण्यात नेहमीच पुढे असतो. पण वरील अनेक गोष्टीत भूतान/ श्रीलंकासारख्या विकसनशील अथवा अत्यंत कमी विकसित देशांचे अनुकरण करावयास काहीच हरकत नाही.

२ नोव्हेंबर ते ७ नोव्हेंबर २०१८ अशी आमची टूर संपवून दिल्ली मार्गे दि. ८ नोव्हेंबर रोजी आम्ही पुण्यास विमानाने परत आलो. पारो ते दिल्ली विमानप्रवासात गर्दी असूनसुद्धा आम्हा सर्वांनाच उजव्या बाजूच्या सीटस् मिळाल्या. सुदैवाने आकाश संपूर्णपणे निरभ्र असल्याने जवळजळ १॥ तास उत्तुंग हिमशिखरांचे मनमुराद दर्शन झाले. त्यात एव्हरेस्टसकट अनेक महत्त्वाची शिखरे होती. आम्हास ती ओळखता आली नाहीत हा भाग वेगळा.

येताना आम्ही आनंद भूमीतील आनंदी लोकांच्या अनेक आठवणी सोबत आणल्यात. त्या आम्हास कायमच आनंदी व समाधानी राहण्याची उर्जा देतील.

- विलास गंधे, पुणे मो. ९३७१२१८७७५

# युनिट वार्ता : कोल्हापूर

कोल्हापूर युनिटची वार्षिक सर्वसाधारण सभा बुधवार दि. ५.९.२०१८ रोजी कोल्हापूर येथे आयोजित करण्यात आली. सभेला एकूण २७५ जण उपस्थित होते.

सेक्रेटरी सौ. नंदिनी पंढरपुरे यांनी १३.०९.२०१७ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे अहवाल वाचन केले व त्यास मान्यता देण्यात आली.

एक ज्येष्ठ पेन्शनर श्री. एच. एस. व्हटकर यांनी आपल्या भाषणात श्री. अशोक स्वामी यांनी गेली अनेक वर्षे निरनिराळ्या पदावर काम करून पेन्शनर्स लोकांची सेवा केली याबद्दल त्यांना जीवनगौरव पुरस्काराने गौरवण्यात येत असल्याचे टाळयांच्या कडकडाटात सांगितले. हा पुरस्कार श्री. व सौ. उमदी यांच्या हस्ते देण्यात आला. सौ. विद्या जोशी यांना कै. जयश्री वालवडकर पुरस्कार देण्यात आला. ह्या संदर्भात सौ. राजाध्यक्ष यांनी सौ. जोशी यांच्या कार्याची स्तुती केली.

सामाजिक बांधिलकी या भावनेतून १० वी व १२ वी परीक्षेत उज्ज्वल यश मिळवणाऱ्या दोन मुलींचा सत्कार करण्यात आला. यानंतर ७५ वर्षे पूर्ण झालेल्या सभासदांचा सपत्नीक रु. ५०१/- स्मृती चिन्ह व पुष्प गुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. श्री. सराफ, खजिनदार यांनी २०१७-२०१८ या आर्थिक वर्षाचा जमाखर्च सादर केला त्याला सभेने मंजुरी दिली. मे. आनंद राठी इन्शुरन्सचे सिनियर ऑफिसर्स श्री. सुनिल व उमेश यांनी मेडिकल स्किमची माहिती श्रोत्यांना दिली. श्री. आर. आर. कुलकर्णी यांनी पुढील दोन वर्षासाठी खालील पदाधिकाऱ्यांची निवड जाहीर केली.

१) श्री. चंद्रकांत गुंडोपंत बेकीनकर
अध्यक्ष - मो. ९५५२८३०६९८
२) श्री. तानाजी ज्योती यशवंत
उपाध्यक्ष मो. ८२०८९१९८७५
३) श्री. बाळकृष्ण सदाशिव वाडकर
सेक्रेटरी मो. ९८८१७६७९२५
४) सौ. लीना अनिल कांबळे - ट्रेझरर

१२.३० चे सुमारास रिजनल मॅनेजर श्री. प्रदीप देव यांचे आगमन झाले. श्री. जगदीश दिवाण, उपाध्यक्ष यांनी पेन्शनर्स मीटचे भाषण केले. आपल्या भाषणात रिजनल मॅनेजर श्री. देव यांनी स्टेट बँक कायमच पेन्शनर्सच्या मागण्या पूर्ण करण्याचा प्रयत्न करीत असल्याचे सांगितले. पेन्शनर्सनी आपल्या ज्ञानाचा, अनुभवाचा बँकेला उपयोग करून द्यावा असे सांगितले. श्री. अशोक स्वामी यांचे अध्यक्षीय भाषण झाले. सर्वांच्या सहकार्याने आपण उत्तम काम करू शकलो याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले. सौ. नंदिनी पंढरपुरे, सेक्रेटरी यांनी आभार प्रदर्शन केले. सुग्रास भोजनाने ही सभा संपन्न झाली.

कोल्हापूर पेन्शनर्स युनिटतर्फे केरळ पूरग्रस्तांसाठी रु. ५१,०००/- चा चेक पूजनीय श्री. काडसिद्धेश्वर महाराज यांच्याकडे सुपूर्त करण्यात आला. या प्रसंगी अध्यक्ष श्री. बेकीनकर, उपाध्यक्ष श्री. तानाजी यशवंत, श्री. उमदी साहेब, श्री. आर. जी. कुलकर्णी, श्री. आर. आर. कुलकर्णी व श्री. एम. आर. मगदुम उपस्थित होते.

सेक्रेटरी, श्री. बाळकृष्ण वाडकर फो. ९८८१७६७९२५

❖ ❖ ❖

## प्रतिसाद

मा. श्री. विलासजी गंधे साहेब, जन. सेक्रेटरी, स. न.

आपल्या व माननीय अध्यक्ष श्री. गोखले साहेबांच्या नेतृत्वात ४ सप्टेंबर २०१८ ची वार्षिक सभा यशस्वीरित्या पार पडली. इतर अनेक कार्यक्रमाबरोबर आपण 'श्री. एन. जी. मोरे स्मृति पुरस्कार' देऊन माझा सत्कार घडवून आणला त्याबद्दल मनःपूर्वक धन्यवाद.

त्याचप्रमाणे आठवण ठेवून त्या सत्काराचे फोटोही मला मिळतील अशी व्यवस्था केली ह्याबद्दल पुनश्च खूप खूप धन्यवाद.

आपणा उभयताच्या नेतृत्वात सर्कल असोसिएशनच्या यशाचा आलेख सतत वरच जाईल असा आम्हाला विश्वास आहे.

कळावे, लोभ असावा

आपला स्नेहांकित

अनिल पिंपळापुरे, नागपूर

# पुस्तक परीक्षणाचे स्वरूप व महत्त्व

पुस्तक परीक्षण : एक पायवाट : वाङ्मयीन संस्कृतीच्या अनेक पायवाटांपैकी पुस्तक - परीक्षण ही एक पायवाट. या पायवाटेने जाताना ही पायवाट सरळ निर्मळ आहे की, दगडा-धोंड्यांनी भरलेली आहे याचा विचार करायला हवा. हा विचार करण्यासाठी चर्मचक्षूंचा नाही तर ज्ञानचक्षूंचा वापर केला पाहिजे. ज्ञानचक्षूंच्या मार्गानेच पुस्तकातील गुणदोषांचा निरपेक्षपणाने वेध घेता येईल असे वाटते. पुस्तक परीक्षण करताना पुस्तकाचे 'असणे' आणि 'दिसणे' या दोन्हींचा साधक-बाधक विचार करणे जरूरीचे आहे.

पुस्तकाचे असणे आणि दिसणे : पुस्तकाचे असणे म्हणजे पुस्तकाचे अंतरंग होय. या अंतरंगात १) पुस्तकाचा आशय (विषय) (२) अविष्कार (३) भाषा, वर्णनशैली उपमा दृष्टांत वगैरे याचा समावेश होतो. कथेमध्ये कथापण आहे का? कवितेत Spontaneous overflow आहे का? नाटकाची भाषा, नाटकातील संवाद तितकेच जिवंत, ठसठशीत आहेत का? पुस्तकाची भाषा ओघवती आहे का? या सर्वांचा विचार करावा लागेल. (४) प्रस्तावना (५) पुस्तकातील रेखाटने.

पुस्तकाचे दिसणे म्हणजे पुस्तकाचे बहिरंग : १) मुखपृष्ठ (२) मलपृष्ठ (३) मूल्य (४) पृष्ठसंख्या (५) लेखक परिचय (६) प्रकाशक - प्रकाशन (७) पुस्तकाची छपाई या सर्वांचा समावेश बहिरंगात होतो.

पुस्तकाचे असणे : 'यशवंतराव चव्हाण : अप्रकाशित आठवणी' या पुस्तकातील आशय, 'व्यास पर्व' मधील आशय, पुरूषोत्तम दारव्हेकर यांच्या 'वऱ्हाडी मानसं' या नाटकातील आशय (संवाद) उदा. नाटकातील आबामालक आपल्या सुनेला सांगतात'' सूनबाई, पदरात निखारे तर घेतले पाहिजेत, पदर तर पेटला नाही पाहिजे, कुलवंतांची चाल तर बिघडली नाही पाहिजे'', 'प्रेमा तुझा रंग कसा?' मधील निळूभाऊ संसाराचे तत्त्वज्ञान सांगताता म्हणतात, ''हातात येतील ते पत्ते हातात घेऊनच संसाराचा डाव खेळला पाहिजे, ती मोडून चालणार नाही.'' 'तलावातले चांदणे' (गंगाधर गाडगीळ) 'दुधावरची साय' (य. गो. जोशी) 'कातरवेळेला (अरविंद गोखले) यांच्या कथांतून येणारा आशय कथेचा साज आणि धाट कोठेही बिघडवित नाही. यथायोग्य मार्गाने कथा पुढे जाते. वाचकांच्या मनावर योग्य तो परिणाम होतो. प्रज्ञा पवार यांची 'अंतःस्थ' नावाची कविता आहे त्यातील काही ओळी पहा :

''आम्ही घट्ट मिटून घेतली
आत्मशोधाची दारे...
तडफडलेल्या प्रतिबिंबाला
चेहरा समजण्याची चूक...''

(आनंदी गोपाळ (श्री. ज. जोशी) दीपज्योती (कुसुमताई अभ्यंकर) टोकदार सावलीचे वर्तमान (रंगनाथ पाठारे) या तीन वेगवेगळ्या विषयांवरील कादंबऱ्या, कादंबरीच्या निकषांना पुरेपर उतरतात. हेच त्यांचे सामर्थ्य.)

Read between the lines, spontaneous over flow हे चांगल्या कवितेचे निकष. या निकषात ही कविता Fit बसते (अंतःस्थ) या कवितेचा समृद्ध आशय हे कवितेचे बलस्थान. औंदुबर त्रिधा राधा, कुब्जा या कविताही निकषांना पार करून जातात. अधिक श्रेष्ठपणाकडे झुकतात.

पुस्तकाच्या भाषेबाबत सांगायचे झाले तर सुजित धर्मपात्रे यांचे 'आधुनिक भारताचा इतिहास' या पुस्तकाबद्दलचा हा अभिप्राय पाहा. ''धर्मपात्रे यांच्या लेखनातील मराठी भाषेचा दर्जा, ओघवती व सहजतेने समजणारी भाषा शैली, मूल्यांकनातील निःपक्षपातीपणा, कमी शब्दांत अधिक आशय सामावणारी शब्दरचना, विविध पैलूंनी इतिहासाचा घेतलेला आढावा यामुळे पुस्तकाचे लेखन दर्जेदार झाले आहे.''

'बालविहग' कविता संग्रहाला डॉ. अनुराधा पोतदार यांची असलेली प्रस्तावना कविता संग्रहाची उंची वाढवते. विद्यार्थ्यांना गाइडची गरज भासत नाही. पुस्तकातील प्रस्तावनेचे कार्यही असाधारण ठरते. पुस्तकातील रेखाटने नेहमीच आशय सौंदर्यात भर घालणारी ठरतात.

पुस्तकाचे दिसणे : पुस्तकाच्या बहिरंगाचा विचार करताना मुखपृष्ठाचा विचार प्राधान्याने करावा लागतो. मुखपृष्ठ म्हणजे पुस्तकाचे प्रवेशद्वार होय असे डॉ. लीला

दिक्षीत म्हणतात. आतील संहितेला पुरक नव्हे तर आतील संहितेचा दर्जा वाढविणारे असे पुस्तकाचे मुखपृष्ठ असावे लागते. 'बालविहग' कविता संग्रहाचे मुखपृष्ठ संपूर्ण कविता संग्रहात डोकावण्यास उपयोगी पडत नाही. ते फक्त एका बालविहग कवितेपुरते मर्यादित राहते. आचार्य अत्रे यांच्या 'सूर्यास्त' (पं. नेहरू) 'इतका लहान एवढा महान' (लाल बहादूर शास्त्री) यांच्या पुस्तकावरील मुखपृष्ठे आतील संहितेला पुरेपुर न्याय देतात.'वाडा चिरेबंदी' वरील मुखपृष्ठ आतील संहितेला पुरेपूर न्याय देते हे खरेच.

पुस्तकाच्या निर्मितीमध्ये सर्वात महत्त्वाची भूमिका बजावणारे संवेदनशील पान म्हणजे मलपृष्ठ. इंग्लिशमध्ये त्याला 'blurb' म्हणतात. हा मजकूर पुस्तकाचे साहित्यिक मूल्य सांगून जातो.

मंगेश पाडगांवकर यांच्या 'चिंतन' या पुस्तकावरील 'blurb' पहा. ''मराठी साहित्य क्षेत्रातील महत्त्वाचे कवी आणि गीतकार मंगेश पाडगावकर यांच्या 'लेखणीचे एक अपरिचित वळण' या पुस्कातील लेखातून प्रत्ययास येईल. गेल्या ५० वर्षात त्यांनी केलेल्या महत्त्वाच्या अनुवादांना त्यांनी लिहिलेल्या अभ्यासपूर्ण प्रस्तावनांचे हे संकलन. पाडगावकरांच्या व्यृतिमत्वाचे एक रसिक आस्वादक आणि सखोल अभ्यासक म्हणून असलेले पैलू या लेखातून दृग्गोचर होतात.'' मलपृष्ठ आणि मुखपृष्ठ हे पुस्तकाचे डावे उजवे हात आहेत.

पुस्तकाचे यथायोग्य शीर्षक म्हणजे पुस्तकाचा मेंदू असे मला वाटते. 'सर्यास्त' आणि 'इतका लहान, एवढा महान' ही दोन्ही शीर्षके पुस्तकातील संहितेला न्याय देतात. 'बालविहग' हे शीर्षक संपूर्ण कविता संग्रहाला न्याय देत नाही.

पुस्तकाचे भरमसाठ मूल्य रसिक वाचकाला पुस्तक खरेदीपासून दूर ठेवते. पुस्तकाची पृष्ठसंख्या पाहूनही काही वेळा वाचक पुस्तक खरेदी करायचे की नाही हा निर्णय घेतो. पुस्तकावरील देखणा लेखक परिचय ही वाचकाला पुस्तक वाचण्यास उद्युक्त करतो. पुस्तकावर लेखक परिचय नसेल तर पुस्तकाच्या एकूण दर्जेदारपणात उणेपणा दिसतो. पुस्तक कोणत्या प्रकाशकाने, छापले आहे यावर पुस्तकाचा दर्जा ठरतो.

पुस्तक परीक्षणात पुस्तकाचा छपाईचाही विचार करणे आवश्यक ठरते. पुस्तकाचा लेखक म्हणजे पुस्तकाची देवकी माता तर मुद्रक हा पुस्तकाची यशोदामाता. लेखकाच्या यशाबरोबर त्यामध्ये मुद्रकाचे यशही १०,२०% समाविष्ट असते. पुस्तकाच्या मुद्रणाचा विचार करताना काही वेळा त्यात मुद्रणदोष असतातही, तरी सुद्धा पुस्तकासाठी वापरलेला दर्जेदार कागद, Font, शाई या सर्वांच्या संगमातून दर्जेदार सुबक छपाई होते म्हणून सुबक मुद्रण हा पुस्तकाचा Plus Point ठरतो. त्याचप्रमाणे पुस्तकाची संहिता दर्जेदार असूनही मुद्रकाचे अज्ञान, हलगर्जीपणा, मुद्रणदोष यामुळे पुस्तकाचे वाङमयीन मूल्य कमी होते हे देखील नाकारता येत नाही.

एखाद्या अभ्यासू व अधिकारी व्यक्तीने (studied personality) निःपक्षपातीपणाने साधक बाधक पुस्तक परिक्षण केले तर सामान्य वाचकाला हा ज्ञानाचा सागर तरून जाण्यासाठी वाङमयीन संस्कृतीची ही पायवाट सोपी होईल यात शंका नाही.

वरील विवेचनात पुस्तक - परीक्षण कसे करावे याचे उत्तर दिले परंतु पुस्तक-परीक्षण का करावे याचे उत्तरही देते. पुस्तकांच्या अफाट संग्रहातून नेमके कोणते पुस्तक वाचावे यासाठी पुस्तक परीक्षण वाचले तर सर्वसामान्य वाचकाला पुस्तक निवड करणे सोपे जाते आणि जावे यासाठी पुस्तक परीक्षणाचा प्रपंच पुस्तक आणि पुस्तक परीक्षण हा वाचन संस्कृतीशी संबंधित असा विषय आहे. लोप पावत असलेल्या वाचन संस्कृतीचा, पुस्तक परीक्षणाच्या पायवाटमुळे परत एकदा उदय होईल. व्हावा हीच पुस्तक परीक्षणामागील मनोकामना!

सौ. अनघा लिमये,
साडवली संगमेश्वर, फोन : ०२३५४-२६०४६६

❖ ❖ ❖

२५
१८

ललित

# गणपतीची 'मूक' आरती

वरील शीर्षक वाचून कोणीही म्हणेल की कुठलीही आरती मुकाट्याने कशी म्हटली जाईल? देवाची दैनंदिन पूजा झाल्यावर आपण प्रथम गणपतीची आरती सुरेल चालीत म्हणत असतो. त्यानंतर इतर देवांच्या आरत्या म्हणतो. आरत्या म्हणत असताना पूजा करणारी व्यक्ती आणि तिथे हजर असणारे बाकीचे, घंटा/झांजा वाजवत असतात. ठेक्यात टाळयाही वाजवत असतात. गणेशोत्सवात तर सार्वजनिक गणपतींपुढे सकाळ-संध्याकाळ लाऊडस्पीकरवर ह्या आरत्या मोठमोठ्याने म्हटल्या जातात. या सर्व आरत्या ऐकण्याची आणि वाद्यांच्या आवाजाची आपल्याला सवय झालेली असते. त्याशिवाय आपल्यालाही देवाची पूजा व्यवस्थित झाल्याचे समाधान होत नाही.

पण मी याबाबतचा माझा एक वेगळा अनुभव कथन करणार आहे. साधारणपणे १९५८-५९ सालची घटना आहे. त्यावेळी गणेशोत्सव चालू झाल्यावर दै. सकाळमध्ये त्यांच्या वार्ताहराने निरनिराळ्या भागात जाऊन, पुण्यातील गणेशोत्सवाचे स्वरूप कसे आहे याबद्दलच्या वार्ता देणे सुरु केले होते. ते फोटोसहीत छापून येत असे. तसे आजही होत असते. दै. सकाळमध्ये २-३ पाने आजही यासाठी राखून ठेवलेली असतात. त्यावेळी त्या वार्ताहराने एका रिपोर्टमध्ये पुण्यातल्या एस.पी. कॉलेज कँपसमध्ये, मागच्या बाजूला असलेल्या 'रुईया मूक-बधीर विद्यालयात' तिथल्या मुलांनी बसवलेल्या गणपतीविषयी माहिती दिली होती. त्यात त्याने म्हटले होते की या शाळेतील गणेशोत्सव सर्वांपेक्षा वेगळा आहे. तो अशासाठी की, शाळेत बसवलेल्या गणपतीपुढे संध्याकाळी जवळजवळ १००-१२५ विद्यार्थी एकत्रितपणे 'मनोभावे' आरती करीत असतात. पण ते विद्यार्थी कोणताही शब्दोच्चार करू शकत नसल्याने (ते मूक-बधीर असल्याने) ती मुलं फक्त 'अभिनयाने'-म्हणजे तोंडाची, चेहेऱ्याची हालचाल करून आणि फक्त टाळ्या वाजवून गणपतीची 'आरती' करत असतात. ती मुले मुकी असल्याने तोंडातून शब्द बाहेर येत नाही. पण त्यांच्या चेहऱ्यावरील हावभाव खरोखरच पाहण्यासारखे असतात. ते दृश्य पाहून तो वार्ताहर म्हणतो - ''मी अवाक् झालो. हा अनुभव लिहिण्यासाठी मला शब्द सुचत नाहीयेत. कारण असे 'मूक' आरतीचे दृश्य मला कुठेही बघायला मिळाले नाही.''

ती बातमी वाचल्यावर त्याच दिवशी संध्याकाळी मी या 'मूक-बधीर विद्यालयात' आरतीच्या वेळी गेलो आणि तो वैशिष्ट्यपूर्ण अनुभव घेतला. खरोखर, ते दृश्य अविश्वसनीय होते. आपले वैगुण्य विसरून ती मुलं अत्यंत उत्साहाने, भक्तिभावाने आरती करताना पाहून डोळ्यातून पाणी आले. परमेश्वराने जरी त्यांना वाचा दिली नसली तरी 'बुद्धी' आणि 'समज' आपल्यापेक्षा जरा जास्तच दिली आहे असे जाणवले.

हा अनुभव मनात घर करून असताना, त्याच वर्षी पुढे दिवाळीच्या सुट्टीत टिळक रोडवरील महाराष्ट्र मंडळात, सुप्रसिद्ध जादुगार 'के. लाल' यांचे जादूचे प्रयोग पाहण्याचा योग आला. ते जादूचे प्रयोग पाहायला मी गॅलरीचे तिकीट काढले होते. प्रो. के. लाल हे सुप्रसिद्ध जादुगार असल्याने प्रयोग 'हाऊसफुल्ल' होता. मी जेव्हा गॅलरीत माझ्या जागेवर जाऊन बसलो तेव्हा माझ्या आजूबाजूला बरीच लहान मुले बसलेली दिसली. त्यांचे आपापसात काहीतरी कुजबुजणे चालू आहे असे जाणवले. पण ते काय बोलतात हे कळत नव्हते. मी गेल्या-गेल्या ५-१० मिनिटातच प्रयोग सुरु झाला. सुरुवातीला नेहमीचा जादूचा प्रयोग, म्हणजे आपल्या उंच टोपीतून रंगीत रुमालातून वेगवेगळी रंगीत फुले काढणे, स्टेजवर बोलावलेल्या मुलाच्या कानाला व नाकाला लावलेल्या नरसाळ्यातून पाणी काढणे, हातातील कागदाच्या शंकूच्या आकाराच्या भांड्यामधून मक्याच्या लाह्या काढणे इत्यादी नेहमीचे हातखंडा प्रयोग सुरु झाले. अर्थात् हे सर्व मुलांचे आवडते खेळ असतात. हे सर्व झाल्यावर स्टेजवर पडदा पडला आणि घोषणा झाली की 'पाचच मिनिटात पुढचा प्रयोग सुरु होईल, तरी कुणीही जागा सोडू नये'. नंतर जवळ-जवळ अडीच तास हे मंत्र-मुग्ध करणारे प्रयोग चालू होते, ज्यात 'जादुगार स्टेजवरून गायब होतो, माणसाचे 'गिलोटिन' मध्ये दोन तुकडे होणे आणि ते पुन्हा जोडले जाणे इत्यादी चित्तथरारक प्रयोगांचा समावेश होता.

पहिल्या प्रयोगानंतर पडदा पडल्यावर माझ्या आजूबाजूला बसलेल्या मुलांकडे माझे लक्ष गेले. ती मुले

आपापल्या शेजारी बसलेल्या मुलाला, जादुगाराने जादूचा प्रयोग कसा केला असेल, हे हाव-भावाने समजावून सांगत होती. मात्र त्यांच्या तोंडातून चकार 'शब्द' बाहेर पडताना दिसत नव्हता. क्षणभर मला त्याबद्दल काही विशेष वाटले नाही. पण काही सेकंदातच मला काही तरी वेगळे जाणवले. मला खात्री पटली की ती सर्व मुले 'रुइया मूक-बधीर विद्यालयातीलच आहेत. झालं, माझे लक्ष जादूच्या प्रयोगांबरोबरच त्या मुलांच्या हालचालींकडेसुद्धा लागून राहिले. कारण दाखवलेला जादूचा प्रयोग कसा केला असेल हे, ते शेजारच्या मित्राला प्रत्येक प्रयोगानंतर हातवारे करून कसे 'समजावून' सांगत हे मी पाहत होतो. किती विलक्षण गोष्ट होती, कारण ते जे 'हाव-भाव' करत होते त्यातून मला पाहिलेल्या प्रयोगाचे पुन्हा मनोमन दर्शन होत होते. अगदी हुबेहूब ! आणि मग मी पुढील सगळे जादूचे प्रयोग, म्हणजे प्रथम जादुगाराकडून केले गेलेले आणि नंतर त्या प्रयोगाचे मुलांनी 'हाव-भावा'तून दाखवलेले कथन, दोन्हीही पाहत होतो. एक गोष्ट लक्षात आली. ती म्हणजे, त्या सर्व 'मूक-बधीर' विद्यार्थ्यांची निरीक्षणशक्ती आणि हाव-भावांनी 'व्यक्त' होण्याची शक्ती ही आपल्यासारख्या सामान्य माणसांच्यापेक्षा कितीतरी पटीने वरच्या दर्जाची होती. विशेष म्हणजे आपले 'अपंगत्व' विसरून त्या जादूच्या प्रयोगांचा मनमुराद आस्वाद ती मुले घेत होती आणि आपल्या मित्राला तेवढ्याच सहजतेने समजावून सांगून त्यातली 'जादू' विषद करून सांगताना दिसत होती. खरंच, 'ईश्वराची लीला अगाध आहे'. प्रत्येक व्यक्तीमध्ये काही ना काही तृटी असतात. पण त्याचवेळी प्रत्येकाच्या अंगात काही ना काही 'विशेष' गुण परमेश्वराने दिलेले असतात. मात्र, प्रत्येकाने ते ओळखले पाहिजेत आणि त्यांचा विकास केला पाहिजे. जीवनाकडे 'सकारात्मकतेने' बघायला शिकले पाहिजे असे ह्या मूक-बधीर मुलांकडे बघून मला जाणवले.

रा. ना. लळिंगकर, पुणे
मोबा. ९८२२१०७९८८

❖ ❖ ❖

# आजी

नका म्हणू तुम्ही मला आजी
आहे मी फाईन ॲन्ड फीट
मनाला होतात क्लेश भारी
म्हणता कुणी मला आजी ।

तुमच्या आधी मी उठते
मॉर्निंग वॉकला जाते
आल्यावर सगळी काम करते खुशी खुशी
तरी मी आजी कशी?

नो B.P. नो शुगर
नो गुडघे दुखी नो कालोस्ट्रोल
रोज योगा करते मी
तरी मी कशी आजी?

पंचवीस माणसांचा सैंपाक
करते मी झटकन्
दमले म्हणत नाही मी
तरी मी कशी आजी?

भरतकाम, विणाकाम करते
घरी बसून मी अर्थाजन करते
पिक आवरला पकडते लोकल मी
तरी मी कशी आजी?

वा लागला मला चष्मा कधी
ना केसांची रूपेरी शेड कधी
दीक्षीत डायट करते मी
तरी मी कशी आजी?

तुम्हाला एकच विनंती
नका म्हणू आजी कधी
म्हणता कुणी आजी
वाटतं वर जायची वेळ आता आली ।

५६/१८

सौ. अंजली केळकर, कल्याण

## पाठलाग

सुखाच्या वस्त्राला
    दुःखाची किनार
हेच असे आयुष्याचे
    वस्त्र जरतार ।।धृ।।
आनंदाच्या सौंदर्याला
    जणू काजळबोट
तसेच हसऱ्या चेहऱ्यावर
    मानवाचे रडके ओठ।।१।।
लाख लाख कळ्यांनी
    हास्यपुष्प फुलले
पण लगेच त्यावर अश्रूंचे
    आषाढ-मेघ बरसले ।।२।।
उन्हाच्या चटक्यानंतर
    सुख देते वृक्षछाया
पण त्यातून बाहेर पडताच
    माध्यान्ही त्या भाजे काया ।।३।।
हर्षाचे ऊन कोवळे
    करी लखलखती किमया
पण सत्वर येते काळोखी ही
    विषादाची मेघ-छाया ।।४।।
शिवाशिवीचा खेळ खेळती
    अश्रू आणि हास्य
हास्य येतसे शरण शेवटी
    मानुनी अश्रूंचे दास्य ।।५।।

४३
१७

सौ. उज्ज्वल ब्रम्हांडकर

FREE -WI-FI
आशियाना
Cottage Akshi Alibag
Welcome For Relaxation
only for senior citizens of all
SBI pensioners and there relative & friends
3-Night 4-Days
package Rs.2500/- per person only
including pickup& drop from Alibag
with 3 days sightseeing Rs.1500/- extra
EVERY MONDAY CHECK IN 11 AM & CHECK OUT THURSDAY 11 AM
We serve veg breakfast-lunch-dinner
NONVEG FOOD & AC ROOM CHARGES EXTRA
BOOKING AMOUNT TRANSFER IN SBI AC NO 30449388216
AC. NAME RAJESH RANADE, IFC: SBIN0013034
CALL : 750 7474 825

पुस्तक परिचय

## रहस्य देवाचे

धुळे येथील सभासद श्री. अशोक बागुल यांचे ''रहस्य देवाचे व मानवाचे'' या नावाचे पुस्तक नुकतेच प्रसिद्ध झाले आहे.

मानवी जीवनात ज्या रहस्यमय व अदृश्य शक्तिमुळे घटना घडतात त्यांच्या विषयी प्रत्येकाच्या मनात जिज्ञासा व औत्सुक्य निर्माण होते याचा शोध घेण्याचा प्रयत्न या पुस्तकात लेखकाने केला आहे.

यापूर्वी ''नया जमाना'' (हिंदी काव्य)'' निसर्ग आपला गुरू'' ही त्यांची दोन पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत. श्री. बागुल यांचे अभिनंदन व त्यांना पुढील लेखनासाठी शुभेच्छा!

**वसंत धुपकर, पुणे**

संपर्क
अशोक बागुल, धुळे, मोबा. : ९४२१६१७४९१

❖ ❖ ❖

ललित

# हव्यास प्रसिद्धीचा

काही व्यक्ती आयुष्यात सामाजिक उन्नतीसाठी काहीतरी ठोस कार्य करतात. अशा व्यक्तींना आपण कर्मयोगी म्हणतो. केलेल्या कार्याबद्दल त्यांना कोणतीच अपेक्षा नसते. कीर्तीची, प्रसिद्धीची हाव नसते. आपल्या कार्याची ते कधीच जाहीरातबाजी करत नाहीत. वर्तमानपत्रांमध्येही स्वखर्चाने बातमी छापून आणत नाहीत. अशा व्यक्ती त्यांनी अंगीकारलेल्या कामाला पूर्णपणे वाहिलेल्या असतात. म्हणूनच त्यांच्या हातून समाजोपयोगी कार्य घडते.

काही लोकांना मात्र अगदी क्षुल्लक अशा कामाचा पण गवगवा करण्याची सवय असते. अशा लोकांची करणी तर शून्य असते; पण बोलणे असे असते की आज जे काही आहे ते फक्त माझ्यामुळेच !

लोककल्याणासाठी केलेलं भरीव काम हे एखाद्या तपश्चर्येप्रमाणे असते. लोककल्याणासाठी करण्यात येणाऱ्या कार्याबरोबर व्यक्तिगत विकास अन् सामाजिक उन्नतीसाठी अशा प्रकारच्या तपश्चर्येची आवश्यकता असते. सृष्टीच्या निर्मात्याने वेदांची पण निर्मिती केली. जर त्या वेदांच्या निर्मात्यांना प्रसिद्धीची लालसा असती तर वेदांवर त्यांनी स्वतःची नावे टाकली असती. पण त्याचं कर्तेपण त्यांनी नाकारलं. हा नक्कीच त्यांच्या मनाचा मोठेपणा आहे. आजच्या जाहिरातीच्या जगात तर त्याचे विशेष महत्व जाणवते. आणखी उदाहरणे द्यायची झाली तर जगप्रसिद्ध अजिंठा, वेरुळची सुंदर लेणी. ही लेणी कोणी खोदकाम करून तयार केली? ताजमहाल, कुतुबमिनार इ. अनेक जगप्रसिद्ध इमारती ज्यांनी वर्षानुवर्षे कष्टून व झिजून तयार केल्या त्या कारागिरांची नावे तरी आपल्याला कुठे माहिती आहेत? एवढ्या सुंदर, अजरामर कलाकृती निर्माण करुनही त्यांच्या निर्मितीच्या श्रेयापासून दूर किंवा अलिप्त राहणे ही वृत्ती किंवा स्वभाव आजकाल तर शोधूनही सापडणार नाही. कारण ही गोष्ट फारच दुर्मिळ आहे.

आजकाल तर प्रत्येकाला श्रेय हवे असते. सतत प्रसिद्धी हवी असते. ती प्रसिद्धी नाही मिळाली तर जिवाची अतिशय तगमग होते. पुढच्या वाटचालीत ह्या मिळणाऱ्या प्रसिद्धीची सवय होते व कालांतराने तिचे विकृत स्वरूप दिसू लागते.

कीर्ती किंवा प्रसिद्धीचा मोह टाळून सतत स्वतःला कामात झोकून देऊन इतिहासाच्या पानावर जे स्वतःच्या कर्तृत्वाची छाप सोडतात त्याच व्यक्ती अजरामर होतात.

सृष्टी व निसर्गापासून या गोष्टी शिकण्यासारख्या आहेत. ऋतुप्रमाणे फुलं उमलतात, वारे थंड, गरम ज्याप्रमाणे ऋतु असेल त्याप्रमाणे वाहतात. सूर्य, चंद्र, तारे आपापल्या नियत वेळेवर उगवतात अन् मावळतात. वनराई, वृक्षवेली बहरतात, नद्या खळाळून वाहतात. हे सर्व करताना त्यांना कुणालाच आपल्या कामाची जाहीरात करण्याची गरज नसते. अतिशय शांतपणे त्यांचे कार्य अव्याहतपणे वर्षानुवर्षे चालू असते. त्यांच्यामुळेच खरे तर आपले जीवन संपन्न व समृद्ध होते. पण या गोष्टींची त्या सर्व नैसर्गिक घटकांना (चंद्र-सूर्य-तारे-वृक्ष-वेली-नद्या यांना) जाणीवही नसते. या सर्वांपासून वेगळ्या असणाऱ्या प्रगत मानवाला मात्र प्रत्येक कामासाठी स्वतःची प्रसिद्धी हवी असते. हा मनुष्य स्वभाव असेलही कदाचित ! अगदी सहलीला गेलेली लहान मुले सुद्धा तेथील भिंतीवर किंवा स्मारकांवर खडूने लिहितात किंवा टोकदार वस्तूने स्वतःचे नाव, चित्र काढून विद्रूप करतात. या कृतीमागे आम्ही या ठिकाणी येऊन गेलो, आमचे कौतुक करावे, चांगले म्हणावे अशी सुप्त इच्छा मनात दडी मारून बसलेली असते. ती अशा वेळेस डोके वर काढते आणि दरवेळी ही त्यांची मानसिक गरजच होऊन बसते. परंतु ज्यांना मोठे कार्य करायचे आहे त्यांनी तात्पुरत्या प्रसिद्धीच्या मागे न लागता ठोस कामगिरी करणे क्रमप्राप्त आहे. अशा भरीव कामगिरीनंतर पैसा, प्रतिष्ठा, किर्ती आपोआप चालत येतात. त्यासाठी कोणतेही डावपेच आखावे लागत नाहीत, कोणतीही व्यूहरचना करावी लागत नाही, कोणाचीही मनधरणी किंवा हांजी हांजी करावी लागत नाही. ज्याप्रमाणे फुलं कितीही वेगवेगळ्या सुगंधाची असली तरी त्यांच्या वर्गवारीनुसार त्यांचा सुगंध दरवळत येतोच. त्याचप्रमाणे केलेल्या चांगल्या कामाची किर्तीही पाठोपाठ येतेच. आपल्याला प्रसिद्धीसाठी काम करायचे नसून समाजाच्या प्रगतीसाठी काम करायचे आहे आणि हे काम सेवाभावी तर राहीलच तसेच ते काम करणाऱ्याला व इतरांना सुद्धा आनंदित करणारे असेल हे पाहणे आवश्यक आहे. स्वतःच्या विकासासाठी आणि समाजाच्या प्रगतीसाठी अशाच भरीव कामगिरीची गरज आहे आणि नेहमीच राहील.

२१/१८

श्रीपाद टेंबे, पुणे, फो. नं. : ९१५८०८८०४२


SBI
पर्सनल लोन
आपली जी काही स्वप्ने आहेत...
आपल्या ज्या काही गरजा आहेत...
आपली यादी
युरोप यात्रा

Regd. under RNI No. MAHBIL/2008/25425 & Declaration No. SDM/PUNE/SR/14/17 Dated 24/01/2017
SSPO Pune under Postal Concession Register No. PCW/151/2017-2019
Licence to Post without Prepayment No.WPP - 22/2017-19 at Market Yard P.S.O.
Published on 25-11-2018 and Posted on 25-11-2018

# ऋण

२७ च्या सकाळीच
भ्रमणध्वनी किणकिणतो,
''पेन्शन जमा'' चा संदेश येऊन पडतो

खरं सांगतो मीच काय
सगळेच सुखावतात,
'माय' SBI चे मनापासून
लक्ष आभार मानतात

PF काय, ग्रॅच्युइटी काय
साठलेलं पाणी असतं
दरमहाच पेन्शन मात्र
वाहता झरा असतो

रोजच्या मीठ-भाकरीला
ताजा पैसा लागतो
भाग्यवान आपण तो
पेन्शनरूपात मिळतो

'खिसा गरम-डोकं शांत'
हेच सूत्र असतं
म्हणूनच आपल्याला
निरामय जगता येतं

ऋण कुणाचं ठेवू नये
म्हणतात असं
आपल्या SBI च सांगा
फेडायचं कसं?

५५
——
१८

आर. पी. कुलकर्णी, अहमदनगर
फो. नं. ९८५०४०६२८८

**सूचना :** १) या मासिकांत प्रसिद्ध झालेल्या लेखांतील मतांशी संपादकमंडळ सहमत असेलच असे नाही. तसेच जाहिरातीतील मजकुराची सत्यासत्यता सभासदांनी स्वत: पडताळून घ्यावी. त्याबाबत असोसिएशन वा 'संवाद' चे संपादक मंडळ जबाबदार असणार नाही. २) असोसिएशनचे कार्यालय, सोमवार ते शुक्रवार, संध्याकाळी ६ ते ७.३० या वेळातच उघडे असते. याची कृपया नोंद घ्यावी. संपर्क दूरध्वनी क्रमांक : (०२०) २४३३२१४१

**Thane Office Address**: A/5 Swami Siddharth CHS Ltd., S V Road, Naupada, Thane 400 602. Tel. No : 022-25446837 Timings : On Tuesday & Friday from 4 pm to 6 pm.

**Printed Matter**

***If Undelivered Please Return to :***

**STATE BANK OF INDIA PENSIONERS' ASSOCIATION, (MUMBAI CIRCLE), PUNE**
**Anubandh, Building No. B-2, 4th Floor,**
**Block No.16, Near Ramkrishna Math,**
**Sinhagad Road, Pune 411030.Ph:020-24332141**

To,

**Publisher** – Shri. Vilas Vasudeo Gandhe, Secretary, State Bank of India Pensioners' Association (Mumbai Circle), Pune has printed this magazine in the Printing Press owned by **Printer** – Shri Shailendra Borkar, Director, Sanwad Tradeprints Pvt. Ltd. B/7 Gowaikar Building, 595, Shaniwar Peth, Pune 411030 on behalf of **Owner** – State Bank of India Pensioners' Association (Mumbai Circle),Pune, at "Anubandh", Bldg.No.B2, Block No.16,Near Ramkrishna Math, Sinhagad Road, Pune – 411030. **Editor** – Shri. Krantisen Ramchandra Athawale – address as above.